15 OCT 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिथे समस्या, तिथे प्रगतीच्या शक्यता अधिक

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : बिदालमधील ग्रामस्थ, विद्यार्थ्यांशी संवाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

ज्या प्रदेशात प्रश्न आहेत, तिथे उन्नतीच्या शक्यता अधिक निर्माण होतात. कारण त्या प्रश्नांची, समस्यांची सोडवणूक हीच आपल्याला पावलापावलाने प्रगतीच्या दिशेने घेऊन जात असते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून जलसंवर्धन आणि वृक्षलागवडीची चळवळ यशस्वी करून दाखविल्याने महाराष्ट्राच्या नकाशावर ठळकपणे स्थान अधोरेखित केलेल्या बिदाल येथील या कामाची पाहणी करण्यासाठी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी बिदाल गावाला भेट दिली. त्यावेळी तेथील ग्रामसचिवालयात ग्रामस्थ व विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ज्याठिकाणी साधनसुविधांची वानवा असते, अशा ठिकाणी शिक्षणाच्या माध्यमातूनच आपल्याला प्रगती साधता येऊ शकते, याच्या जाणिवा प्रखर असतात. त्यामुळे येथील युवकांनी ही जाणीव मनात ठेवून अभ्यास केला आणि विविध स्पर्धा परीक्षांत यश मिळविले. मात्र त्यांनी आपल्या गावाकडे पाठ फिरविली नाही, ही बाब अत्यंत कौतुकास्पद आहे. त्यामुळे गावच्या विकासकामांमध्ये त्यांचे कोणत्या ना कोणत्या प्रकारे योगदान असल्याचे दिसते. बिदाल या गावाने जलसंवर्धन व १५ लाखांहून अधिक वृक्ष लागवडीचे केलेले काम प्रशंसनीय आहे.

लोकसहभागातूनच आपल्याला विकास साधता येऊ शकतो, याचे बिदाल उदाहरण ठरले आहे. आणि ही विकासकामे करीत असताना कोणतेही मतभेद आपण त्या कामांच्या आड येऊ देत नाही, हे फार महत्त्वाचे आहे. हा एकोपा गावाने असाच जपावा आणि प्रगतीपथावर वाटचाल करीत राहावे.



**कोल्हापूर : बिदाल ग्राम सचिवालयातील सानेगुरूजी ग्रंथालयासाठी 'महान शिवाजी' हा महाग्रंथ सरपंच प्रमोद जगदाळे यांना भेट देताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ.**

बिदालमधील लोकसहभागातून साकारलेल्या विविध विकासकामांची पाहणी केली. सानेगुरूजी ग्रंथालयासाठी शिवाजी विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या डॉ. बाळकृष्ण लिखित व डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'महान शिवाजी' या ग्रंथाच्या प्रती कुलगुरूंनी सरपंच प्रमोद जगदाळे यांच्याकडे सुपूर्द केल्या. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने कुलगुरूंचा पारंपरिक घोंगडी व पुष्पगुच्छ प्रदान करून सत्कार करण्यात आला.

यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, शिवाभाऊ जगदाळे, प्रताप भोसले, सुरेश जगदाळे, सुरेशभाऊ जगदाळे, हणमंतराव जगदाळे, रावसाहेब देशमुख, किशोर इंगवले, शंकर जगदाळे, सुशांत ढोक, अमित कुचेकर, विजय खरात आदी उपस्थित होते.

15 OCT 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी महाराजांनी मराठ्यांच्या हृदयात स्वराज्य निर्मिले

## ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार: शिवाजी विद्यापीठातील 'शिवजागर' परिसंवादात प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवराज्याभिषेकाचे हिंदुस्थानच्या इतिहासात मोलाचे स्थान होते. राज्याभिषेकाची संकल्पना शिवाजी महाराज आणि त्यांच्या मातोश्री जिजाऊसाहेब यांना सुचणे हीच मुळी क्रांतीकारक बाब होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी केवळ भूमीवर नव्हे, तर प्रत्येक मराठ्याच्या हृदयात स्वराज्य निर्माण केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभागाचे छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र, कृष्णा पब्लिकेशन्स आणि सह्याद्री प्रतिष्ठान, मुळशी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवराज्याभिषेक दिनाच्या ३५०व्या वर्षानिमित्त आयोजित 'शिवजागर' परिसंवादामध्ये प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'शिवजागर' परिसंवादात बोलताना ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार. सोबत डॉ. अशोक चौसाळकर, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. सदानंद मोरे, डॉ. गणेश राऊत, अनिल पवार.

डॉ. पवार म्हणाले, राज्याभिषेकाची जाहीर घोषणा होणे हा भारताच्या इतिहासातील अपवादात्मक क्षण होता. शिवाजी महाराजांच्या मनात स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाच्या बरोबरीनेच दिल्ली काबीज करण्याची महत्त्वाकांक्षा होती, याचे पुरावे आहेत. पण अकाली निधनामुळे ते शक्य झाले नाही. त्यांच्या माघारी स्वराज्याची व्यापक संकल्पना त्यांच्या वंशजांना पेलली नाही, याची मोठी खंत वाटते. स्वराज्याचा विस्तार निश्चितपणे झाला, मात्र त्यांना सार्वभौमत्वाचा विसर पडला होता. सार्वभौमत्व सोडले नसते, तर या भारतात वेगळे चित्र दिसले असते.

इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सदानंद मोरे म्हणाले, शिवराज्याभिषेक ही इतिहासाचा प्रवाह बदलणारी घटना होती. छत्रपती शिवाजी महाराज त्याचे इतिहास नायक होते. औरंगजेबासारख्या बादशहाने निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही संपविल्या. पण त्याला मराठ्यांचे स्वराज्य अखेरच्या क्षणापर्यंत संपविता आले नाही. छत्रपती संभाजी महाराज यांच्यापासून ते महाराणी ताराराणी यांच्यापर्यंत मराठ्यांनी त्याला चांगलेच झुंजवित ठेवले. त्याला स्वराज्य जिंकता आले नाही, याला शिवाजी महाराजांचे कर्तृत्व कारणीभूत आहे. मराठ्यांमुळेच पुढे दिल्ली वाचली. अन्यथा भारतावर अफगाणांचे वर्चस्व प्रस्थापित झाले असते तर इतिहास काही निराळाच असला असता.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले, शिवाजी महाराजांच्या राजसत्तेला अधिमान्यता मिळवून देणे, हा शिवराज्याभिषेकामागील प्रमुख हेतू होता. राज्याभिषेक करवून घेत असताना महाराजांना अनंत अडचणींचा सामना करावा लागला. त्यातूनही धर्मशास्त्रातील अडथळे दूर करीत महाराजांनी हा राज्याभिषेक घडवून आणला. अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवराज्याभिषेक ही देशाच्या इतिहासातील असामान्य घटना आहे.

'शिवजागर' या उपक्रमाच्या माध्यमातून शिवाजी महाराज आणि त्यांचा इतिहास सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्यात यश येईल. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. अनिल पवार यांनी 'शिवराज्याभिषेक' या ग्रंथाच्या निर्मितीमागील प्रेरणा व भूमिका विषद केली. चेतन कोळी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गणेश राऊत यांनी आभार मानले. यावेळी शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत

# भाषेच्या विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जपली पाहिजे : शिंदे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भाषेच्या विद्यार्थ्यांनी वाचा, वेचा, साठवा, उपयोगात आणा या चतुःसूत्रीतून वाचन संस्कृती जपली पाहिजे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी शुक्रवारी केले.



विद्यापीठातील हिंदी विभागामार्फत आयोजित भारतीय भाषा उत्सव कार्यक्रमात ते बोलत होते हिंदी, संस्कृत, मराठी, बुंदेलखड़ी, अवधी, मैथिली, मारवाड़ी, उर्दू या भाषांचा परिचय देणारे पोस्टर प्रदर्शन विद्यार्थ्यांनी भरवले. याचे उद्घाटन भारतीय जीवन बीमा निगमचे कोल्हापूर शाखेचे कार्मिक ओ औद्योगिक संबंध विभागाचे मुख्य प्रबंधक राजेंद्र पाटेकर यांच्या हस्ते झाले. इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ. प्रभंजन माने यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. डॉ. चंदा सोनकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. विजय सदामते यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अमृता कांबळे हिने सूत्रसंचालन केले.

पुढारी

# भाषेच्या विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृतीचे जतन करावे : शिंदे

कोल्हापूर : भाषेच्या विद्यार्थ्यांनी 'वाचा, वेचा, साठवा आणि उपयोगात आणा' या चतु:सूत्रीतुन वाचन संस्कृतीचे जतन केले पाहीजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागामार्फत यू. जी. सी. दिल्ली यांच्या वतीने 'भारतीय भाषा उत्सव' हा कार्यक्रम आयोजित केला होता. हिंदी, संस्कृत, मराठी, बुंदेलखडी, अवधी, मैथिली, मारवाडी, उर्दू, या भाषांचा परिचय देणारे 'पोस्टर प्रदर्शन' भरवण्यात आले. यावेळी भारतीय जीवन बीमा निगम कोल्हापूर शाखेचे कार्मिक औद्योगिक संबंध विभागाचे मुख्य प्रबंधक राजेंद्र पाटेकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. डॉ. चंदा सोनकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. विजय सदामते यांनी करून दिला. सूत्रसंचालन कु. अमृता कांबळे हिने केले. यावेळी डॉ. प्रभंजन माने तसेच विद्यार्थी उपस्थीत होते.

पुण्यनगरी

# जिल्ह्यात व्यसनमुक्ती अभियान सुरू

कोल्हापूर : येथील ब्रह्माकुमारी वैद्यकीय प्रभाग, शिवाजी विद्यापीठ आणि एनएसएस राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या व्यसनमुक्ती अभियानाची सुरुवात झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. पी. एम. चौगुले, राजयोगिनी ब्रह्माकुमारी सुनंदा बहेनजी आणि नशामुक्त भारत अभियानचे राष्ट्रीय संयोजक ब्रह्माकुमार डॉ. सचिन परब यांच्या प्रमुख उपस्थित शिवाजी विद्यापीठात प्रारंभ झाला. भारतातील ३७२ जिल्ह्यांत हे अभियान राबविण्यात येत आहे. याअंतर्गतच जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालयांत हे अभियान १८ ऑक्टोबरपर्यंत राबविण्यात येणार आहे.

सकाळ

# शाहू महाविद्यालयात कार्यशाळा

कोल्हापूर : "राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शिक्षकांना योगदान द्यावे लागेल. त्यासाठी अधिकाधिक विद्यार्थी वर्गात तासासाठी उपस्थित राहतील, यासाठी प्रयत्न करावेत," असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अभ्यासमंडळाचे अध्यक्ष डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले. येथील शाहू महाविद्यालयात बी. एस्सी. भाग दोनसाठी नवीन अभ्यासक्रमावर आधारित एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली, त्या वेळी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम म्हणाले, "राष्ट्रीय धोरणाला सामोरे जाताना शिक्षकांनी संदर्भ ग्रंथांचा वापर करणे आवश्यक आहे. त्या आधारे आपला अभ्यासक्रम चांगल्या प्रकारे अध्यापन करावा." या वेळी बी. एस्सी. भाग दोनच्या वनस्पतीशास्त्र पाठ्यपुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. उपप्राचार्य डॉ. एस. जे. आवळे, प्रा. पी. एस. चौगुले, डॉ. व्ही. बी. शिंपले, डॉ. एस. एस. खोत, डॉ. एन. ए. कुलकर्णी, डॉ. आर. आर. देवकर आदींनी मार्गदर्शन केले. डॉ. शकील शेख यांनी स्वागत केले. डॉ. एस. पी. रोडे यांनी आभार मानले.

लोकमत

# किशोर बेडकिहाळ यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्यावतीने मंगळवारी ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांचे 'महात्मा गांधींचा सामाजिक समावेशनाचा दृष्टिकोन' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. प्रा. डॉ. एस. एस. महाजन हे अध्यक्षस्थानी असतील. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये सकाळी १०:३० वा. व्याख्यान सुरू होईल. या व्याख्यानास उपस्थित राहावे, असे आवाहन सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राचे संचालक प्रा. एस. एस. महाजन व विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून ग्यान कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागाच्यावतीने सोमवारी, १६ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर या कालावधीमध्ये पाच दिवसीय ग्यान कार्यशाळेचे आयोजन राजर्षी शाहू सभागृहात केले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन सोमवारी सकाळी १० वाजता विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा.डॉ.एम.एम. साळुंखे यांच्या हस्ते होईल. अमेरिकेतील प्रा.डॉ.पी.व्ही. कामत व प्र-कुलगुरू प्रा.डॉ.पी.एस. पाटील हे प्रमुख अतिथी असतील. कुलगुरू प्रा.डॉ.डी.टी. शिर्के हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. या कार्यशाळेत प्रगत कार्यात्मक पदार्थ किंवा संमिश्रे व त्यांचा वापर हरितऊर्जा तंत्रज्ञानासाठी या विषयावर प्रा.डॉ.पी.व्ही. कामत, प्रा.सतीश पाटील, प्रा.संतोष हराम, प्रा.डॉ.एस.डी.डेळेकर हे मार्गदर्शन करणार आहेत.